# येशू हा राजांचा राजा आहे

## मुलांना येशूचे आज्ञापालन करण्यास शिकवा

**प्रार्थना:** "हे आमच्या पित्या मुलांचे येशूवर प्रेम असल्यामुळे त्यांना येशूच्या आज्ञा पाळण्यासाठी कृपा करून ह्या अभ्यासाचा उपयोग करून घे."

मुलांसाठी पुढीलपैकी कोणताही किंवा सर्व शैक्षणिक कार्यक्रम निवडा.

मोठया मुलाने वा शिक्षकांनी लूक 7:1-10 मधून येशूच्या आज्ञेचे पालन करणाऱ्या सैनिकाचा कथावृत्तांत्त वाचून दाखवा यावरून एका रोमन सैन्याच्या अधिकाऱ्याला शताधिपतीला थोर राजाचे आज्ञापालन करणे म्हणजे काय हे समजले होते असे दिसते.

शक्य असल्यास मुलांना रोमन सैनिकाचे चित्र काढण्यास किंवा रंगवण्यास सांगा.

कथावृत्तांत्त सांगून झाल्यावर पुढील प्रश्न विचारा.

- येशूने आपल्यासाठी काय करावे अशी रोमन सैनिकाची इच्छा होती? *(उत्तर: पाहा वचन 3)*
- सैनिकाला मदत करण्याविषयी येशूला कोणी सांगितले? *(3)*
- सैनिक येशूला भेटण्यास का आला नाही? *(वचन 7 आपली तेवढी योग्यता नाही असे त्याला वाटले)*
- *येशूचा अधिकार सर्व गोष्टींवर आहे असा भरंवसा धरून सैनिकाने त्याच्यावरील विश्वास कसा प्रकट केला? 7-8)*
- सैनिकाने येशूच्या आज्ञेचे पालन कसे केले? *(वचन 7 त्याचा आजारी नोकर बरा होईल हे येशूचे शब्द त्याने स्वीकारले)*



कथावृत्तांत्ताचे नाट्यीकरण करा मुलांकडून नाटिकेची तयारी करून घ्या. तुम्ही सगळे भाग केलेच पाहिजेत असे नाही.

मोठया मुलांनी किंवा प्रौढांनी पुढील भूमिका कराव्यात.

**निवेदक** कथावृत्तांत्ताचा सारांश करा आणि मुलांकडून संवाद पाठ करून घ्या.

**शताधिपती**

**सैनिक**

**येशू**

लहान मुलांनी पुढील भूमिका कराव्यात:

**सेवक** जमीनीवर झोपा आणि खूप आजारी असल्याचा अभिनय करा.

**यहूदी** लोक (शताधिपतीचे मित्र)

## नाटिका, भाग 1, लूक 7:1-7

**निवेदक:** कथावृत्तांत्ताचा पहिला भाग सांगा (वचने 1-6) आणि म्हणा "शताधिपतीचा सेवक काय म्हणतो ते ऐकू या."

**सेवक:** "धनी मला बरे वाटत नाही या आजारातच मी मरणार."

**शताधिपती:** "येशू कफर्णहूमला आला आहे. तो तुला बरे करील मी त्याला निरोप पाठवतो."

**यहूदी लोकांना म्हणा,** "मित्रहो, माझा हा सेवक मरायला टेकला आहे. कृपा करून येशूला त्याला बरे करायला सांगा. येशू खूप थोर आहे त्याच्याकडे जाण्याची माझी पात्रता नाही."

**यहूदी लोक:** "आम्ही तुमच्यासाठी जाऊ" येशूकडे जाऊन म्हणा,

"येशू कृपा करून आमच्याबरोबर या."

"रोमन शताधिपतीचा चाकर आजारी आहे त्याला बरे करा."

"शताधिपती भला माणूस आहे."

"तो आमची काळजी घेतो आमचे सभास्थान त्यानेच बांधून दिले."

**येशू:** "मी येतो तुमच्या बरोबर."

## नाटिका, भाग 2, लूक 7:7-10

**निवेदक:** कथावृत्तांत्ताचा दुसरा भाग सांगा (वचने 7-10) आणि म्हणा, शताधिपती काय म्हणतो ते ऐका"

**शताधिपती:** "येशूला जाऊन भेटावे एवढी माझी पात्रता नाही. त्याने शब्द जरी बोलला तरी माझा चाकर बरा होईल. सैनिक तू तिकडे जा."

**सैनिक:** सलाम ठोकून म्हणा, "जशी आज्ञा महाराज!" (येशूकडे जा)

**यहूदी लोक:** "शताधिपतीचे घर काही फार दूर नाही, जरा लवकर चला!" "तो पाहा त्याने एक सैनिक पाठवला."

**सैनिक:** येशूकडे जाऊन म्हणा, "येशू आपण खूप थोर आहात हे माझ्या धन्याला ठाऊक आहे. दिलेल्या आज्ञेचे तत्काळ पालन होते हेही त्यांना माहित आहे. कृपा करून त्याच्या चाकराचा आजार बरा करा!"

**येशू:** "आज्ञापालन म्हणजे काय ते ह्या सैनिकाच्या सेनापतीला चांगलेच माहित आहे. माझ्या आज्ञेत अधिकार आहे हेही त्याला ठाऊक आहे. ह्या आजारावरील माझ्या अधिकारावर त्याचा विश्वास आहे. असा विश्वास मला संपूर्ण इस्राएलातही पहायला मिळला नाही!"

**निवेदक:** नाटिका संपल्याचे सांगून यासाठी मदत करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना.

उपासनेच्या पुढाऱ्यांशी बोलून मुलांसाठी पुढील गोष्टींची व्यवस्था करा

- उपासनेच्या वेळी मोठया माणसांसमोर नाटिका सादर करणे.
- ह्या अभ्यासाच्या आरंभी दिलेले प्रश्न मोठया माणसांना विचारणे
- मुलांनी तयार केलेली कविता व इतर गोष्टी सादर करणे.

**मुलांना विचारा:** आम्ही पाळल्याच पाहिजेत अशा कोणत्या गोष्टी करण्याची आज्ञा येशूने आम्हांला केली आहे?

राजमुगूटाचे **चित्र काढा.** मुलांना तसे काढायला सांगा.

- मोठया मुलांनी लहान मुलांना मदत करावी पुढच्या उपासनेच्या वेळी मुलांनी आपले चित्र सर्वांना दाखवावे यावरून येशू हा राजांचा राजा असून त्याच्यावरील प्रेमासाठी आपण त्याच्या आज्ञा पाळतो हे दिसते असे स्पष्ट करा.



**पाठ करा.** राजांचा राजा, योहान 14:15 मध्ये म्हणतो, “माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल.”

**कविता.** तीन मुलांनी मत्तय 28:18,19 व 20 ही वचने प्रत्येकी एक याप्रमाणे म्हणावीत.

“स्वर्गात आणि पृथ्वीवर सर्व अधिकार मला दिलेला आहे.”

तेव्हा तुम्ही जाऊन सर्व राष्ट्रांतील लोकांस शिष्य करा,

त्यांस पित्याच्या पुत्राच्या व पवित्र आत्म्याच्या नावाले बाप्तिस्मा द्या.”

“जे काही मी तुम्हांला आज्ञातिले ते सर्व त्यांस पाळावयास शिकवा आणि पाहा, युगाच्या समाप्तीपर्यन्त मी सर्व दिवस तुमच्याबरोबर आहे.”

मोठया मुलांना, येशूच्या आज्ञा पाळण्यास आम्हांला का आवडते या विषयावर कविता गीत किंवा छोटी गोष्ट लिहिण्यास सांगा.

**प्रार्थना:** “प्रिय प्रभू तुझी वचने ऐकायला आम्हांला आवडते आणि त्याप्रमाणे आचरण करण्याचीही आमची इच्छा आहे. तू राजांचा राजा आहेस आणि आमचे तुझ्यावर प्रेम आहे म्हणून आम्ही तुझ्या आज्ञा पाळतो”

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net